लोकमत

# सायबर सुरक्षेवर झाली कार्यशाळा

**लातूर :** श्री कुमारस्वामी महाविद्यालयात 'सायबर सुरक्षा' कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. राजर्षी शाहू महाविद्यालय आणि क्विक हिल फाउंडेशनच्या सहकार्याने झालेल्या या कार्यक्रमात 'सायबर वॉरियर्स' ओमकार सूर्यवंशी आणि अर्जुन चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर, फिशिंगपासून बचाव आणि सुरक्षित पासवर्ड तयार करण्याचे तंत्र शिकवले. सायबर फसवणूक झाल्यास १९३० हेल्पलाईनवर तक्रार करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

Hello Latur
Page No. 1 Aug 22, 2025
Powered by: erelego.com